# House breaking Property seized by Dhule Police

Local Crime Branch police seized stolen property of House Breaking.

## घरफोडीप्रकरणी दोघे ताब्यात; मुद्देमाल जप्त



स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने कारवाईनंतर ताब्यात घेतलेले सोन्याचे दागिने.

प्रतिनिधी | धुळे

शहरात वेगवेगळ्या ठिकाणी घरफोड्या झाल्याने पोलिस चोरट्यांच्या मागावर होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे अन्वेषणं विभागाच्या पथकाने दोन संशयितांना अटक केली आहे. त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली असून, पोलिसांनी दोघांकडून सोन्याचे दागिने जप्त केले आहेत.

शहरात गेल्या काही दिवसांपासून घडफोडीचे प्रमाण वाढले आहे. बहुतांश घरफोड्या घराचा कडीकोयंडा तोडून करण्यात आल्या आहेत. याप्रकरणी शहरातील वेगवेगळ्या पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. गेल्या काही दिवसांपासून पोलिस चोरट्यांच्या मागावर होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने शहरातील अंबिका नगरातील हॉटेल डीडीआरसी मागे राहणाऱ्या अस्लम शेख खाटीक इस्माईल उर्फ अस्लम चिंधी व वडजाई रोड परिसरातील मोहसीन इस्माईल बागवान उर्फ दालचावल या दोघा संशयितांना अटक केली आहे. त्यांनी देवपूर, धुळे शहर, थाळनेर, पिंपळनेर पोलिस ठाणे हद्दीत घरफोडी केल्याची कबुली दिली आहे. त्यांच्याकडून १ लाख ८९ हजार रुपयांचे सात तोळे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. पोलिस निरीक्षक देविदास शेळके, सहायक पोलिस निरीक्षक भगवान मथुरे, सहायक पोलिस उपनिरीक्षक विजय पाटील, पोलिस हवालदार सुनील महाजन, राजेंद्र सोनवणे, मोहसीन काझी, मुख्तार शेख, संदीप थोरात, देवेंद्र परदेशी, रवींद्र शिंपी, प्रवीण पाटील, हिरालाल ठाकरे, नितीन चव्हाण, आरिफ शेख, कबीर शेख, दीपक पाटील यांच्या पथकाने ही कारवाई केली.

## शेतकरी, शेतमजूर, कामगार परिषदेचे उद्या धरणे आंदोलन

धुळे | शेतकरी, शेतमजूर कामगार परिषदेतर्फे सोमवारी (दि.२) एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. वाघोदे, जातोडा औष्णिक विद्युत प्रकल्प व मेथी, विखरण औष्णिक विद्युत प्रकल्पात स्थानिकांना रोजगार देण्यात यावा या मागणीसाठी हे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती परिषदेचे राजदीप आगळे यांनी दिली.

शासनाने औष्णिक वीज प्रकल्पासाठी वाघोदे-जातोडा परिसरात जमीन संपादित केली आहे. त्याचबरोबर विखरण परिसरातही जमीन संपादित करग्यात आली आहे. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांसमोर आता रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला आहे. जिल्हा मागास असल्याने पूर्वीच बेरोजगारीचे प्रमाण वाढले आहे. जिल्ह्यात सातत्याने शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांनी औष्णिक वीज प्रकल्पासाठी जमीन दिली आहे अशा शेतकऱ्यांना चोवीस तास वीजपुरवठा करण्यात यावा, वीज प्रकल्पात ऐंशी टक्के स्थानिकांना रोजगार देण्यात यावा, अशी मागणी या आंदोलनाद्वारे करण्यात येणार आहे. आंदोलनात संबंधितांनी सहभागी व्हावे, असे आवाहन हिंमत कोळी, भगवान वाघ, राजदीप आगळे आदींनी केले आहे.